# ।। श्रध्दांजली ।।

दि.२५/११/२०१६

दि.२६/११/२००८ रोजी मुंबई येथे अतिरेकी हल्ल्यात शहिद झालेले पोलीस / लष्करी अधिकारी कर्मचारी व १७५ निरपराध नागरीक यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी नागरीकांना केलेल्या नम्र आवाहना बाबत......

---

" आओ झुककर सलाम करे उन्हे,

जिनकी जिंदगी में ये मुकाम आया है /

किस कदर खुशनसिब है वो लोग,

जिनका लहु देश के काम आया है / "

पुणे शहर पोलीस दलातर्फे सर्व नागरीकांना विनम्र आवाहन करण्यात येते की, दि.२६/११/२००८ रोजी मुंबई शहरामध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा मुकाबला करताना,महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी / कर्मचारी, एन.एस.जी.चे कमांडो, होमगार्ड आणि १७५ निरपराध नागरिक यांनी आपले प्राण गमावले आहेत. सदर घटनेला दि.२६/११/२०१६ रोजी ०८ वर्षे पुर्ण होत आहेत.

त्यानिमित्ताने दि.२६/११/२०१६ रोजी सकाळी ०८/४५ वा. सर्व सामान्य नागरीकांनी जवळच्या पोलीस स्टेशन / चौकी याठिकाणी एकत्र जमुन,शहिदांच्या स्मृतीला, मेणबत्ती-ज्योत लावुन पुष्प अर्पण करून, श्रध्दांजली वाहण्यासाठी दोन मिनिटे स्तब्धता राहुन श्रध्दांजली अर्पण करावी. कार्यक्रमाचे ठिकाणी गुलाब,मेणबत्त्या व स्टॅण्डची व्यवस्था करण्यात आली आहे.

तसेच सदर दिवशी सकाळी ०८/४५ वा. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचेसह प्रतिष्ठीत नागरीक व स्वातंत्र्य सैनिक यांचे उपस्थितीमध्ये पोलीस मुख्यालय शिवाजीनगर,पुणे या ठिकाणी शहिदांना श्रध्दांजली अर्पण करण्याचा मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

तरी मुंबई अतिरेकी हल्ल्यातील शहिद व आपल्या प्राणास मुकलेले निरपराध नागरीक यांच्या पवित्र स्मृतीला श्रध्दांजली वाहण्यासाठी पोलीस मुख्यालय,शिवाजीनगर,पुणे येथे येण्याचे सर्व नागरीकांना पुणे शहर पोलीस दलांतर्फे विनम्र आवाहन करण्यात येत आहे.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर